# जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती सभा दिनांक ०६.०५.२०१६ रोजीचे कार्यवृत्त

## भाग-१

जलव्यवस्थापन व स्वच्छता समितीची सभा डॉ. पंजाबराव देशमुख सभागृह, जिल्हा परिषद, अमरावती येथे दिनांक ०६.०५.२०१६ रोजी दुपारी ११.०० वाजता आयोजित करण्यात आली. मा. अध्यक्ष, जिल्हा परिषद, अमरावती यांनी सन्मा. सभापती, बांधकाम व शिक्षण श्री. गिरीष कराळे, सन्मा. सभापती महिला व बाल कल्याण सौ. वृषालीताई विघे, सन्मा. सभापती कृषी व पशुसंवर्धन सौ. अरुणाताई गोरले, सन्मा. सभापती समाजकल्याण सौ. सरीताताई मकेश्वर तसेच सन्मा. जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती सदस्य, मुख्य कार्यकारी अधिकारी, खाते प्रमुख, उप अभियंता सर्व व पत्रकार यांचे सभेच्या उपस्थिती निमित्ताने स्वागत केले व सचिव यांना सभा सुरु करण्यास अनुमती दिली.

**श्री. पोटफोडे का.अ. (सिंचन) :-** जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती सभेला उपस्थित मा. अध्यक्ष, सन्मा. सभापती, मा. मु.का.अ. यांचे मी स्वागत करतो. आजचा पहिला विषय मागिल सभा दिनांक ७ एप्रिल २०१६ चे कार्यवृत्तास मान्यता देणे. अनुपालनाच्या प्रति सर्व सन्मा. सदस्यांना देण्यात आलेल्या आहेत.

**मा. सौ. सुरेखाताई ठाकरे सदस्या जि.प. :-** माझ्या मतदार संघातील वडूरा - खराळा नाला सरळीकरण त्यांच्या खात्याकडे होते. नालासरळीकरणाचे काम त्यांनी कसेही करावे काय ? याबाबत माहिती द्यावी.

**श्री. खंडारे, उप अभियंता, स्था.स्तर :-** वडूरा ता. चांदूर बाजार येथील नालासरळीकरणाचे काम नियमानूसार झालेले आहे.

**मा. सौ. सुरेखाताई ठाकरे सदस्या जि.प. .-** ठीक आहे. आपल्याला या कामांची चौकशी करता येते काय? करता येत असेल तर करावी. मागील सभेमध्ये ठराव घेण्याचे सुचविले होते पण तसा ठराव का घेण्यात आलेला नाही?

**श्री. पोटफोडे का.अ. (सिंचन) :-** मागील सभेमध्ये तसा ठराव घेण्यात आलेला नाही.

**मा. सौ. सुरेखाताई ठाकरे सदस्या जि.प. :-** हया कामांचा कोण कंत्राटदार आहे. त्या कंत्राटदाराचे किती चोचले पुरवावयाचे. मला आणि तुम्हाला सर्व माहित आहे. खरवाळीचे काम जिल्हा परिषदेने केले आता स्थानिक स्तर तेच काम पुन्हां करत आहे. सांगा डेप्युटी इंजिनिअर आपण केले की नाही.

**उप अभियंता (सिंचन) अचलपूर :-** आपण मागच्या वर्षी ३०० मीटरचे काम केले आहे.

**मा. मु.का.अ. :-** मग ते आपण कसे केले?

**उप अभियंता (सिंचन) अचलपूर :-** लोकल सेक्टरने काम केले आहे.

**मा. सौ. सुरेखाताई ठाकरे सदस्या जि.प. :-** लोकर सेक्टरची मनमानी सूरु आहे. मी पत्रकारांना सुध्दा विनंती करते की, त्यांनी सुध्दा याबाबत आपल्या वृत्तपत्रामध्ये वृत्त प्रकाशित करावे.

**मा. अध्यक्ष :-** सदर प्रकरण चौकशीसाठी आपण जिल्हाधिकारी यांचेकडे पाठवू.

**मा. सौ. सुरेखाताई ठाकरे सदस्या जि.प. :-** उदया जर पाऊस आलातर चौकशीस काय अर्थ आहे. हे अधिकारी पाऊस येण्याची वाटच पाहत आहे. जो पर्यत जिल्हा परिषद अशा कामांवर लक्ष ठेवणार नाही तो पर्यत असा प्रकार होणार आहे. मिटींगमध्ये आपण चौकशीचे आदेश देतो त्यानंतर त्या कामाची चौकशी तुम्ही सुध्दा विसरुन जाता. जिल्हाधिकाऱ्यांकडे किती दिवसात तुम्ही चौकशीसाठी पाठविणार. जिल्हाधिकाऱ्यांना सुध्दा विषयाचे गांभीर्य लक्षात घेवून तातडीने चौकशी करायला लावा. तुम्ही तुमचा अधिकार वापरा.

**मा. अध्यक्ष :-** पाणी पडण्याअगोदरच चौकशी करण्याबाबत मा.जिल्हाधिकारी यांना कळविण्यात येईल. तेव्हा याबाबत सभागृहाच्या भावना लक्षात घेता, मा.जिल्हाधिकारी यांना चौकशी करण्याबाबत प्रशासनाने तातडीने कळवावे .

**मा. सौ. सुरेखाताई ठाकरे सदस्या जि.प. :-** या विषयासाठी आम्ही उपोषणाला बसणार आहोत. कार्यकारी अभियंता यांना बैठकीला ठेवा. सी.ई.ओ. साहेब आपल्याला अधिकार आहेत. नागरीक सुध्दा चौकशी मागू शकतात. माझ्याही कामाची टेप लावून चौकशी करा. जर चूकीचे असेलतर मी स्वत: माफी मागेल नाहीतर त्या विभागाचे अभिनंदन करेल.

**श्री. पोटफोडे का.अ. (सिंचन) :-** अनुपालन मुद्दा क्रमांक : १ - चे वाचन करण्यात आले.

**मा. श्री. बापुरावजी गायकवाड, सदस्य जि.प. :-** तुम्ही अहवाल दिला काय? काम काहीच नाही. एम.बी. भरली आहे. मी वरुडला जावून आलो. काहीच काम झाले नाही.

**श्री. पोटफोडे का.अ. (सिंचन) :-** याची चौकशी करण्याकरिता यवतमाळचे कार्यकारी अभियंता नेमले आहे. त्यांचा अहवाल आला नाही.

**मा. श्री. बापुरावजी गायकवाड, सदस्य जि.प. :-** Reminder केव्हा पाठविले. आठ महिन्यानंतर reminder पाठविले आहे. वरुडच्या प्रकरणात कोण- कोण अधिकारी होते ते सांगा.

**श्री. पोटफोडे का.अ. (सिंचन) :-** कामाशी संबधित तत्कालीन कार्यकारी अभियंता श्री क्षीरसागर, श्री. कुलकर्णी उप अभियंता व श्री भलावी शाखा अभियंता हे होते.

**श्री. पोटफोडे का.अ. (सिंचन) :-** अनुपालन मुद्दा क्रमांक : २ चे वाचन करण्यात आले.

**मा. सौ. सुरेखाताई ठाकरे सदस्या जि.प. :-** त्यापैकी आजच्या बैठकीला किती अधिकारी हजर आहेत. कृषि खात्याचे अधिकारी कोण आले आहेत. पूर्वी बैकीला कृषि अधीक्षक हजर राहत होते.

**श्री. पोटफोडे का.अ. (सिंचन) :-** अनुपालन मुद्या क्रमांक :३ चे वाचन करण्यात आले.

**मा. श्री. सदाशिव खडके, सदस्य जि.प. :-** ताईने मुद्या उपस्थित केला म्हणून मागच्या मिटींगमध्ये उप अभियंता आले होते. आता पर्यवेक्षक बैठकीला पाठविले आहेत. पुढे हजेरी लिपीक पाठवतील. कृषि विभागाने स्थानिक जनप्रतिनिधी यांना विश्वासात घेवूनच साईटचे सिलेक्शन करावे.

**कृषि विभागाचे प्रतिनिधी** :- कृषि विभागामार्फत सी.एन.बी. चे आणि छोटे-छोटी कामे घेतली जातात.

**मा. श्री. सदाशिव खडके, सदस्य जि.प. :-** दरवर्षी आपण नालाखोलीकरणाचे कामे करता. एकाच पुरामध्ये माती निघून जाते. हया कामांचे साईट सिलेक्शनसाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांना आपण विश्वासात घेत नाही. कामाचे भूमीपूजन स्थानिक जनप्रतिनिधी यांचे हस्ते आपण का करत नाही. माझी विनंती आहे आपण कृषि विभागातील कामे घेतांना स्थानिक जनप्रतिनिधी यांना विश्वासात घ्यावे.

**कृषि विभागाचे प्रतिनिधी** :- कृषि विभागातील कामांचे भूमीपूजन स्थानिक लोकप्रतिनिधी यांना सोबत घेवून करण्यासाठी तालुका स्तरीय अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

**मा. श्री. सदाशिव खडके, सदस्य जि.प. :-** शासनाच्या कोणकोणत्या योजना/कार्यक्रम कृषि विभागामार्फत राबविल्या जातात याची माहिती द्या.

**कृषि विभागाचे प्रतिनिधी** :- कृषि विभागामार्फत इतर योजनांसोबत जलयुक्त शिवार योजना राबविण्यात येत आहे. त्यासाठी गांवनिहाय आराखडा तयार करण्यात येत आहे. जनजागृतीसाठी गावा-गावत शिवार फेरी काढण्यात येत आहेत. यामध्ये शेतकरी, ग्रामस्थ व लोकप्रतिनिधी यांचा सहभाग घेण्यात येत आहे.

**मा. श्री. सदाशिव खडके, सदस्य जि.प. :-** आता पर्यंत किती फेऱ्या काढल्या.

**मा. मु.का.अ.** :- माझे म्हणणे असे आहे की, सभागृहात याचा विचार करावा. ग्रामपंचायतीने काम करण्यास आमच्या हातात काम द्या. जलयुक्त शिवार मध्ये आपण २५३ गांवाचे नियोजन केले आहे. ज्या ठिकाणी विहीरी कोरडया पडल्या आहेत, टँकरग्रस्त गांवे आहेत ती प्राध्यान्याने आपणास घेता येतील. ७६ कोटी रुपयांचा आराखडा आपण तयार केला आहे. आज आपण ठराव घ्यावला पाहीजे. जून्या प्रशासकीय मान्यता असलेली कामे आपण प्रथम हाती घेवू आणि पहिल्या वर्षात हया संपवून टाकू.

**मा. सौ. सुरेखाताई ठाकरे सदस्या जि.प. :-** तुम्ही २५३ गांवामध्येच जलयुक्त शिवार राबविणार ना.

**मा. मु.का.अ.** :- फेज नुसार आपण घेणार आहोत. काही कृषि विभाग, काही लोकर सेक्टर, काही जि.प. कडून होतील.

**मा. सौ. सुरेखाताई ठाकरे सदस्या जि.प. :-** तुमचा विषय बरोबर आहे आपणाकडे अधिकार आहेत. ७६ कोटींचे नियोजन तयार आहे. तश्या सूचना सर्वांना दिल्या आहेत काय? सर्व बाजुने कामे सूरु आहेत. पण लोकर सेक्टरनी जर नाला खोलीलकरणाचे कामे आहे. तर माझ्या भागातील पाण्याची पातळी वाढविण्यासाठी याचा किती फायदा झाला हे सांगा. मला मान्य आहे पाण्याची पातळी वाढविण्यासाठी हे करायला पाहीजे जिथे पाणी जिरतच नाही तिथे हे घेवून काहीच उपयोग होत नाही.

**श्री. पोटफोडे का.अ. (सिंचन) :-** मोठी कामे, पूर्णा नदीवरील कामे पूर्णा प्रकल्प अचलपूर/ राज्यस्तर यांचेकडून होणार आहेत.

**मा. सौ. सुरेखाताई ठाकरे सदस्या जि.प. :-** लोकल सेक्टरने माझ्या भागात नालासरळीकरणाचे कामे केली आहेत त्याचा काय उद्देश आहे हे सांगा. काळी माती चोपण असेलतर पाणी जिरते काय? कृषि विभागाचे कोण आहे येथे त्यांना सांगावे.

**प्रतिनिधी कृषि विभाग :-** नाही. काळी माती चोपण असेलतर पाणी जिरत नाही.

**मा. सौ. सुरेखाताई ठाकरे सदस्या जि.प. :-** माझ्या मतदार संघातील पाण्याची पातळी वाढली काय ते सांगा.

**प्रतिनिधी कृषि विभाग :-** मागणी नुसार कामे घेण्यात आली आहेत.

**मा. सौ. सुरेखाताई ठाकरे सदस्या जि.प. :-** कोणाची मागणी होती ते सांगा.

**मा. श्री. गिरीषभाऊ कराळे सभापती :-** ज्या कामामुळे जनतेला फायदा होईल ते घ्या. काळया मातीत नाला खोलीकरण घेतले असेल तर पाणी जिरत नाही. जी.एस.डी.ए.ला विचारा.

**जी.एस.डी.ए. जि प प्रतिनिधी :-** काळया मातीमध्ये percolation होत नाही फक्त irrigation साठी वापर होतो.

**मा. सौ. सुरेखाताई ठाकरे सदस्या जि.प. :-** माझे हेच म्हणणे आहे. आम्ही मागणी केली म्हणजे १००% तुम्ही करता काय? आम्ही मागणी केली तरी तुम्ही टेक्नीकल मत द्यायला पाहीजे.खरवाडीमध्ये कामामध्ये पूर्ण झोपडपट्टीमध्ये पाणी शिरले. आपले ७६ कोटीचे नियोजन आहे ते करा पण आमचे म्हणणे एकच आहे जेथे गरज नसताना नाला खोलीकरण केल्या गेले आहे. पण पाण्याची पातळी किती वाढली? मला याची चारही बाजूने चौकशी पाहीजे.

**मा. श्री. गिरीषभाऊ कराळे सभापती :-** तुमच्या मताशी मी सहमत आहे.

**श्री. पोटफोडे का.अ. (सिंचन) :-** वरुड - मोर्शी हे डार्क झोनमध्ये आहे. तिथे पाण्याची पातळी वाढली आहे.

**मा. श्री. गिरीषभाऊ कराळे सभापती :-** सन्मा. सौ. सुरेखाताई ठाकरे सदस्य यांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे त्याबाबत स्थानिक स्तर विभागाकडून स्पष्टीकरण मागविण्यात यावे.

**मा. श्री. महेंद्रसिंग गहरवाल, सदस्य जि.प.** :- चिखलदरा - धारणीमध्ये पाणी टंचाई आहे तेथे तुम्ही काय केले ते सांगा. चिखलदरा येथे सर्वात कमी कामे केली आहेत. लातूर सारखी परिस्थिती चिखलदरात आहे. मागच्या वर्षी तुमचे काय नियोजन होते. सी.ई.ओ. स्वत: फिरुन सांगत आहेत हे कामे घ्या ते कामे घ्या. तुमचे काय नियोजन आहे. श्री. ईश्वरकर उप अभियंता हे रेग्युलर नसताना यांनी मेळघाटमध्ये चांगले काम केले आहे.

**मा. श्री. सदाशिव खडके, सदस्य जि.प. :-** धारणीला विद्युत फार कमी आहे. विद्युत येईपर्यत हॅन्डपंप दुरुस्तीकरीता जास्तीचे साहित्य चिखलदरा- धारणी येथे पुरविण्यात यावे.

**श्री.येवले उप कार्य. अभियंता (ग्रापापु)**:- हात पंपाचे सुटे साहित्य उपलब्ध आहे. मागणीनुसार पाठवित आहोत कुठेच अडचण जाणार नाही.

**मा. श्री. सदाशिव खडके, सदस्य जि.प. :-** अतिरिक्त कोठा नाही काय?

**श्री.येवले उप कार्य. अभियंता (ग्रापापु)** :- त्यामध्ये टेकनिकल अडचणी आहेत.

**मा. श्री. सदाशिव खडके, सदस्य जि.प. :-** सद्यस्थितीत जे साहित्य/सुटेभाग आहेत ते वेळेवर पाठविलेतर काम होईल.

**श्री.येवले उप कार्य. अभियंता (ग्रापापु)**:- दक्षता घेतो.

**मा. श्री. सदाशिव खडके, सदस्य जि.प. :-** माझ्या गावात विहीर पुनर्भरण करण्यासाठी अतिरिक्त पाच - सहा बोअर करण्यात आलेले आहेत. बोअरचे काम केल्यानंतर ते तसेच दगड ठेवून निघून गेले काही दुर्घटना झालीतर फार मोठी जोखीम आहे. कोणत्या यंत्रणेकडून काम केल्या गेले हे माहित नाही. काम करताना स्थानिक जनप्रतिनिधींना विचारणा करण्यात आलेली नाही. हे कोणाकडून काम झाले?

**श्री.येवले उप कार्य. अभियंता (ग्रापापु)**:- स्टेट जी.एस.डी.अे. कडून झाले असेल तर माहिती घेतो.

**मा. श्री. सदाशिव खडके, सदस्य जि.प. :-** आज बोअर करण्यासाठी पुण्यावरुन गाडी आली. उर्वरीत काम कोण करणार आहे. स्थानिक लोकांना जवाब आम्हाला द्यावा लागतो. हे कामे करण्याची गरज काय होती. याचा काय फायदा होणार आहे. बोअरच्या तोंडावर दगड ठेवून ते निघून गेलेत. त्यांना त्वरीत करण्यास सांगा. नाहीतर त्यांचे बील थांबविण्यात यावे.

**श्री.येवले उप कार्य. अभियंता (ग्रापापु):-** याबाबत माहिती घेवुन संबंधितास सांगतो.

**मा. मु.का.अ.** :- गावाने काम केले असेल तर असे होणार नाही. यामध्ये असे आहे, जेथे टॅंकर ग्रस्त गांवे असतील तेथे पहिली priority आहे. मी मेळघाटातील काही गांवाना भेटी दिल्यात. आमची विहीर बंद आहे पण बाजूला संत्र्याची

बाग आहे. MREGS मधून विहीर घेवून पाणी पुरवठा होवू शकतो. आवागड मध्ये विहीर आहे मी भेट दिल्यानंतर तेथे काम सुरु झाले. जलयुक्त मधून हे सर्व केले तर हा विषय येणार नाही.

**मा. सौ. सुरेखाताई ठाकरे सदस्या जि.प. :-** आमचे म्हणणे हेच आहे की, आम्हाला विश्वसात घेवून काम घ्या. आम्ही तुमच्या सोबत आहोत.

**मा. श्री. सदाशिव खडके, सदस्य जि.प. :-** माझ्या मतदार संघातील कुभळगव्हाण येथे हातपंपावर सोलर आहे. त्यावरील सोलर काही दिवसांपासून बंद आहे. त्याबाबतची फाईल सी.ई.ओ. साहेब आपल्याकडे आहे.

**श्री. बुरघाटे उप अभियंता (ग्रापापु):-** सदर कामासाठी पाच वर्षापूर्वी योजना केली होती. सध्या योजना बंद आहे. याकामासाठी टंचाईमध्ये अंदाजपत्रक तयार करुन जी.एस.डी.अे. उपविभागाकडे सादर केले आहे.

**मा. मु.का.अ.** :- एका आठवडयात पाहून सांगा. टंचाईचा विषय आहे.

**मा. श्री. सदाशिव खडके, सदस्य जि.प. :-** धारणी- चिखलदरा मधील कुपनलिका किती प्रस्तावित आहेत किती मंजुर आहेत किती सुरु आहेत याची माहिती द्यावी.

**उपअभियंता, भु.स.वि.यं.** :- चिखलदरा येथे ९ मंजुर कामे आहेत त्यापैकी २ कामे केली आणि चिखली येथे झाली आहेत. धारणी मध्ये सहापैकी कामे झाले नाहीत. ऑर्डर दिली आहे.

**मा. श्री. सदाशिव खडके, सदस्य जि.प. :-** मे महिना निघून गेला आहे. या आठवडयात किमान कामे व्हायला पाहिजेत.

**मा. सौ. सरिताताई मकेश्वर, सभापती समाजकल्याण** :- भातकुली येथील कळमगव्हाण येथील काम सुरु झाले काय?

**श्री. ढेरे उप अभियंता (सिंचन)** :- कळमगव्हाण ता. भातकुली येथील काम जलयुक्त शिवार मधून मंजुर आहे. वर्क ऑर्डर झालेली आहे. कंत्राटदार यांना साफ सफाईकरुन लेव्हल करण्यास सांगितले आहे.

**मा. सौ. सरिताताई मकेश्वर, सभापती समाजकल्याण** :- भूमीपूजनाचे अगोदर साफसफाई करता येते काय?

**मा. श्री. गिरीषभाऊ कराळे, सभापती शिक्षण व बांधकाम** :- त्या सन्मा. सभापती आहेत. तुम्हाला काम सुरु करण्याचे आहे. सन्मा. सभापती यांना सूचना देण्यास तुम्हाला त्रास होतो काय.

**श्री. ढेरे उप अभियंता (सिंचन)** :- सरपंच यांना सांगितले आहे आणि श्री. मकेश्वर साहेंब यांना सांगितले होते.

**मा. श्री. गिरीषभाऊ कराळे, सभापती शिक्षण व बांधकाम** :- तुम्ही त्यांची भेट घ्या. मा. आमदार मॅडम सोबत चर्चा करावी.

**<u>मा. श्री. महेंद्रसिंग गहिलवार, सदस्य जि.प.</u>:-** इतिवृत्त पान क्रमांक ११ प्रमाणे. चौकशी होईपर्यंत संबंधित कंत्राटदाराला वर्कऑर्डर देवू नये असे होते.

**<u>मा.मु.का.अ.:-</u>** मी त्यांना प्राथमिक अहवाल सादर करण्यास सांगितला आहे. वर्क ऑर्डर दिली नाही.

**<u>मा. सभापती यांचे परवानगीने येणारे वेळेवरील विषय :</u>**

**<u>विषय क्रमांक १</u> :- साठवण तलाव दहीगांव पुर्णा ता. चांदूर बाजार जिल्हा अमरावती या कामाचे सुधारीत अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजुरी करित. शिफारस मिळणेबाबतच्या विषयावर साधक-बाधक चर्चा होऊन सर्वानुमते मंजुरात प्रदान करण्यात आली.**

**<u>विषय क्रमांक २</u> :- नागपूर व अमरवती महाराष्ट्र जीवन प्राधीकरण विभागाची सन २०१५-१६ ची दरसूचीला जलव्यवस्थापवन समिती सभेची मंजुरी मिळणेबाबतच्या विषयावर खालील प्रमाणे साधक-बाधक चर्चा होऊन सर्वानुमते मंजुरात प्रदान करण्यात आली.**

**<u>विषय क्रमांक ३</u> :- ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जिल्हा परिषद अमरावती या कार्यालयातील नोंदवहया अद्यावत परिपूर्ण ठेवण्याबाबत व वर्षातून चार वेळा विषय समितीसमोर ठेवण्याबाबत माहे मार्च २०१६ अखेरचा तिमाही अहवालावर साधक-बाधक चर्चा होऊन सर्वानुमत मंजुरात प्रदान करण्यात आली.**

**<u>मा. श्री. महेंद्रसिंग गहिलवार, सदस्य जि.प.</u>:-** मा. मु.का.अ. साहेबांना आमच्या मेळघाट भागात दौरा करुन पाणी टंचाई व इतर विषयांची पाहणी केली व समस्या समजावून घेतल्या त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो व तसा ठराव घेण्यात यावा. काही गावातील पाणी टंचाई ' समस्या नव्याने उद्भवली आहे. माझी विनंती आहे की, मग्रारोहयो मधून सार्वजनिक विहीर मंजुर करावी. जी.एस.डी.अे. ने मागणीनुसार स्पॉट देण्याबाबत सूचना देण्यात याव्यात.

**<u>मा.अध्यक्ष :</u>** सन्मा. श्री. महेंद्रसिंग गहिलवार, सदस्य जि.प. यांनी सुचविल्यानुसार अभिनंदन ठराव घेण्यात यावा.

**<u>मा. मु.का.अ.</u>** :- पाणी टंचाईच्या संदर्भात संबंधित तहसिलदार आणि गट विकास अधिकारी यांचेकडून अहवाल घ्यावा.

यानंतर सभेसमोर कोणतेही विषय शिल्लक नसल्याने कार्यकारी अभियंता (सिंचन) यांनी सर्व उपस्थित सन्मा. पदाधिकारी/सदस्य/अधिकारी/कर्मचारी यांचे आभार मानुन मा. अध्यक्षांचे परवानगीने सभा संपल्याचे जाहीर केले.

सचिव तथा
अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, अमरावती

सभापती
जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती
जिल्हा परिषद, अमरावती